# मीरा भाईंदरमध्ये मराठीसाठी महामोर्चा

## मनसे, ठाकरे गट पुन्हा एकत्र; अमराठी व्यापाऱ्यांच्या आंदोलनाला प्रत्युत्तर



**मुंबई–** मुंबई तसेच उपनगरांत मराठीच्या मुद्द्यावरून वातावरण ढवळून निघाले आहे. महाराष्ट्रात राहायचे असेल तर मराठी बोलावेच लागेल, अशी भूमिका मनसेने घेतली आहे. तर अशाच प्रकारची भूमिका घेत ठाकरे गटानेही मराठीचा पुरस्कार केला आहे. काही दिवसांपूर्वी मीरा भाईंदरच्या व्यापाऱ्यांनी मोर्चा काढत भाषासक्ती खपवून घेतली जाणार नाही, अशी भूमिका घेतली होती. आता याच मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून मीरा भाईंदरमध्ये मराठी भाषेसाठी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाच्या निमित्ताने ठाकरे गट आणि मनसे पुन्हा एकदा एकत्र पाहायला मिळाले आहेत.

या मोर्चामध्ये मनसे आणि ठाकरे गटाचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ठाकरे गटाचे आमदार राजन विचारे यांनीही या मोर्चात हजेरी लावली. तसेच मनसेचे नेते संदीप देशपांडे, मनसेचे नेते तथा माजी आमदार नितीन सरदेसाई यांनीही या मोर्चात हजेरी लावून महाराष्ट्रात राहायचं असेल तर मराठी आलीच पाहिजे, अशी भूमिका घेतली.

**अमराठी व्यापाऱ्यांनी काढला होता मोर्चा**

काही दिवसांपूर्वी मनसेच्या एका कार्यकर्त्याने मीरा भाईंदरमध्ये एका अमराठी व्यापाऱ्याला मराठीमध्ये बोल म्हणत मारहाण केली होती. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यानंतर मात्र मारहाणीचे हे प्रकरण चांगलेच गाजले होते. याच मारहाणीविरोधात मीरा भाईंदरमधील अमराठी व्यापाऱ्यांनी मोर्चा काढला होता. तसेच अशा प्रकारची गुंडगिरी थांबवावी, मारहाण करणाऱ्या मनसेच्या कार्यकर्त्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली होती.

**रेल्वे स्थानकाजवळ जमले मराठी लोक, नेत्यांची भाषणं**

याच मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून आज (७ जुलै) मराठी भाषिकांचा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण देत या मोर्चाला परवानगी नाकारण्यात आली होती. मात्र हा आदेश झुगारून मीरा भाईंदरच्या रस्त्यांवर मराठी भाषिक एकत्र जमले होते. मीरारोडवरील रेल्वे स्थानकावर मराठी लोक जमले होते. यावेळी एका ट्रकवर उभे राहून मनसे, ठाकरे गट, महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांनी जमलेल्या आंदोलकांना संबोधित केले.

**प्रताप सरनाईकांवर टीका**

यावेळी महाराष्ट्रात राहून मराठी शिकावी लागेल. मुजोरी केली तर कानाखाली खावीच लागेल, असा इशारा संदीप देशपांडे यांनी दिला. तर राजन विचारे यांनी शिंदे गटाचे नेते प्रताप सरनाईक यांच्यावर टीका केली. प्रताप सरनाईक यांना या मोर्चात सहभागी होण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. त्यांनी अगोदर आपल्या मंत्रिपदाचा, आमदारकीचा राजीनामा द्यावा, त्यानंतरच त्यांनी या मोर्चात सहभागी व्हावे, असा हल्लाबोल राजन विचारे यांनी केला.

# संगमनेरमध्ये ३५, पारनेर ३८ तर अकोलेत ३२ नवीन रेशन दुकान

## जिल्ह्यात १७३ ठिकाणी स्वस्त धान्य दुकानांना सरकारकडून मंजुरी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्हा पुरवठा विभागाने विविध कारणांनी रद्द केलेले परवाने, चालकाने राजीनामा दिलेला, तसेच अद्याप गावात रेशन दुकान नसलेल्या जिल्ह्यातील १७३ ठिकाणी नवीन स्वस्त धान्य दुकान सुरु करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. जिल्ह्यात नव्याने मंजूरी मिळालेल्या रेशन दुकानात सर्वाधिक पारनेर तालुक्यात ३८ गावांत, संगमनेरमध्ये ३५ तर अकोले तालुक्यातील ३२ गावांचा समावेश आहे. या ठिकाणी ३१ जुलैपर्यंत इच्छूकांना पुरवठा विभागाकडे अर्ज करता येणार आहे.

जिल्ह्यातील १ हजार ८८७ स्वस्त धान्य दुकानातून २९ लाख ६६ हजार लाभार्थ्यांना धान्याचे वाटप केले जाते. अंत्योदय योजनेचे ८७ हजार कार्डधारकांना असून ३ लाख ८६ हजार लाभार्थी आहेत तर प्राध्यान्य कुटुंब योजनेचे ६ लाख ३७ हजार कार्डधारक असून २५ लाख ६३ हजार लाभार्थी आहेत. पुरवठा विभागाने ग्रामीण भागात १६४ व नगर शहरातील ९ ठिकाणी नवीन स्वस्त धान्य दुकान सुरु करण्यास निविदा प्रसिद्ध केली. ३१ जुलैपर्यंत इच्छूकांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर किंवा संबंधित तहसिल कार्यालयाचा पुरवठा शाखेकडे अर्ज करता येणार आहे. शासनाने ठरवलेल्या प्राधान्यक्रमानुसार दुकानांना मंजुरी देण्यात येणार आहे.

**महिला बचत गटांना प्राधान्य**

रेशन दुकानासाठी पहिले प्राधान्य ग्रामपंचायत (संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था) तर दुसरे प्राधान्य बचत गटांना असणार आहे. यानंतर नोंदणीकृत सहकारी संस्था तसेच सार्वजनिक संस्था किंवा सार्वजनिक न्यास यांचा विचार केला जाणार आहे. प्राप्त अर्जांपैकी एकाची निवड जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती करणार आहे. बचत गटाला परवाना देताना महिला ग्रामसभेची शिफारस विचारात घेऊन अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. दुकानाचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुहाद्वारे करणे आवश्यक आहे. संबंधित संस्थेला पोलिस विभागाचा चारित्र्य पडताळणी अहवाल बंधनकारक आहे.

**महसूली गावात नवीन दुकान**

**अहिल्यानगर–** पिंपरी घुमट. **कर्जत–**गायकरवाडी. **संगमनेर–** अमरापूर, अजमपुर, जुनेदगाव, हसनाबाद, मोधळवाडी, औरंगपूर, वैदुवाडी, शिरापूर, गोडसेवाडी, मेंगाळवाडी, धुपे, माळवाडी, आभाळवाडी, शेळकेवाडी, खंदार,माळवाडी, पेमरेवाडी, बोरबनवाडी, खंडेरायवाडी, माळेगाव पठार, बाळापूर, चौधरवाडी, जांभळवाडी, रायते, चिंचपूर खुर्द. **राहुरी–** मोरवाडी, कनगर खुर्द, बोधेगाव, महालगाव. **अकोले–** काळेवाडी, केळी, कोतुळ, कोभांळणे, गारवाडी, चांद सूरज, ढगेवाडी, धुमाळवाडी, मुथाळणे, नाचणठाव, निरगुडवाडी, पिसेवाडी, पोपेरेवाडी, बोरी, भोजदरवाडी, यसरठाव, रेडे शिंदे, शिवाजीनगर, शेरेवाडी, सुलतानपूर, सोमलवाडी. **श्रीरामपूर–**वांगी बु., **श्रीगोंदा–** घोडेगाव, भिंगान, गार, चोरमलेवाडी, डोमाळवाडी, मासाळवाडी, चौरसांगवी. **कोपरगाव–**बक्तरपुर, हंगेवाडी.

**राजीनामा अथवा परवाना रद्द**

**अहिल्यानगर–** कोळपे आखाडा, सांडवे, मजले चिंचोली. **कर्जत–** चांदे खुर्द, नागमठाण, माही, सिद्धटेक, कुंबेफळ, माळेवाडी. **राहाता–** सावळी विहीर बु., पिंपरी लोकाई, डोऱ्हाळे, वाकडी. **संगमनेर–** वडगावपान, बांबळेवाडी, कणसेवाडी, चिंचेवाडी, बोटा, कोकणेवाडी. **राहुरी–** डिग्रस, चिंचाळे, गडदे आखाडा. नेवासा गायगव्हाण, जवळे खुर्द, **श्रीरामपूर–** उक्कलगाव, कडीत खुर्द. **अकोले–** मनोहरपुर, डोंगरवाडी, टिटवी, खोदणी, भंडारदरा, आंबे, वंगण, मोरवाडी, खानापूर, शोगो शर्ट, टाकळी. **श्रीगोंदा–** बाबुर्डी, आनंदवाडी. **कोपरगाव–** सावळगाव, अंजनापुर. **पारनेर–**मुंगशी, अस्तगाव, पळवे बु., वाघुडे खुर्द, बिहर बावाडी, डोंगरवाडी, वडोले, रेणवडी, पिंपरी जलसिंग, सुलतानपूर, वाघुंडे, कासारे, गाजदीपूर, मोरवाडी, धवनवाडी, सिद्धेश्वर वाडी, पाडळी रांजणगाव, पिंपळगाव तुर्क, हत्तलखिंड, वेसदरे, गारगुंडी, गोदरे, कारेगाव, शेरी कासारे, गारखिंडी, जाधववाडी, हकीगत, मांजरपूर, खडकवाडी, पळशी, घाटेवाडी, घाणेगाव, बाबुळवाडी, राळेगण थेरपाळ, पिंपरी पठार, रांजणगाव मशीद, म्हशे खुर्द. **पाथर्डी–** सोमठाणे खुर्द, पारेवाडी, दगडवाडी, वडगाव भोसे, भाकरवाडी, लोसर, औरंगपूरवाडी, बोदरवाडी, निंबोडी, चिंचपूर पांगुळ. **जामखेड–**जवळा १, जवळा २, बोरले.

**शहरी भागातील नवीन दुकान**

राहुरी बु. आणि पाथर्डी क्रमांक ८. श्रीगोंदा– श्रीगोंदा दूध उत्पादक संस्था. पारनेर– पारनेर पश्चिम. नगर शहर अनुप गुंदेच्या क्रमांक १५, अरुण लोढा क्रमांक ८, टी डी क्रमांक १८ यासह संगमनेर मुन्सिपल सोसायटी क्रमांक २, संगमनेर म्युनिसीपल सोसायटी सोसयटी क्रमांक ३ ही स्वस्त धान्य दुकाने अवसायनात गेल्याने नविन परवाने देण्यात येणार आहेत.

# संविधान हे देशातील रक्तविरहित क्रांतीचे शस्त्र- सरन्यायाधीश भूषण गवई

**मुंबई (प्रतिनिधी)–**व्यक्तींना पदे मिळतात ती सत्ता नसते. संविधानिक पदावर व्यक्ती जातो तेव्हा त्यालाही घटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार काम करणे अभिप्रेत असते. आपल्या देशाची राज्यघटना ही या देशात रक्तविरहित क्रांती निर्माण करण्याचे शस्त्र आहे, असे प्रतिपादन देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी मंगळवारी येथे केले. संविधान शताब्दीकडे जात असताना या प्रवासात माझाही काहीसा वाटा असेल हे मी भाग्य समजतो, असे गवई म्हणाले.

सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्राचे सुपुत्र असलेल्या भूषण गवई यांचा आज महाराष्ट्र विधानमंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात झालेल्या या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे तसेच दोन्ही सभागृहातील सर्व पक्षांचे गटनेते, प्रतोद उपस्थित होते. भारताची राज्यघटनाफ या विषयावर बोलताना भूषण गवई यांनी भारतीय संविधानाचे महत्व आपल्या शैलीत विशद केले. त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा.. या ओळींनी केली. माझ्या २२ वर्षांच्या कालखंडात चांगले न्यायदानाचे काम करता आले. सामाजिक आणि आर्थिक समानता निर्माण करण्याचे जे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते त्यात खारीचा वाटा उचलण्याची संधी मिळाली. भारतीय संविधानाच्या ७५ वर्षांच्या प्रवासात कार्यपालिका, विधिमंडळ आणि न्यायपालिका या संविधानाच्या तीनही स्तंभांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेनुसार आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडली आहे.

# गोदावरीत ३५९१८ क्यूसेकने विसर्ग सुरू

## जायकवाडीत उपयुक्त साठा आज ६५ टक्क्यांच्या पुढे सरकणार

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** दारणा गंगापूर धरणांच्या पाणलोटात काल पावसाचा जोर ओसरला होता. अधून-मधून बुरबुर स्वरूपाचा पाऊस पडत होता. घाटमाथ्यावरील पाणी नव्याने दाखल होत असल्याने धरणात पाण्याची आवक सुरूच आहे. खाली गोदावरीत जायकवाडीच्या दिशेने ३५ हजार ९१८ क्यूसेकने विसर्ग सुरू आहे. जायकवाडी जलाशयात उपयुक्त साठा ६०.७१ टक्के इतका झाला आहे. उद्या गुरुवारी दिवसभरात जायकवाडी ६५ टक्क्यांच्या पुढे सरकेल. त्यामुळे समन्यायी पाणी वाटप कायद्यातून नगर, नाशिक जिल्ह्यांना यंदा पुन्हा दिलासा मिळणार आहे.

काल सकाळी ६ वाजता संपलेल्या मागील २४ तासात दारणा धरणात १ टीएमसी पाणी नव्याने दाखल झाले आहे. काल सकाळी ९ वाजता दारणा धरणातून १०८१४ क्यूसेकने विसर्ग सुरू होता. तो दुपारी ३ वाजता घटवून ८३४८ क्यूसेकवर आणण्यात आला. काल सकाळी सहा पर्यंत १ जूनपासून ७.१ टीएमसी क्षमतेच्या दारणा धरणातून ७.४ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला. या धरणात ६७ टक्के पाणी साठा आहे. दारणा समूहातील भावलीतून ७०१ क्यूसेक, वाकीतून ३६३ क्यूसेक आणि भाम मधून १७९४ क्यूसेकने विसर्ग दारणा धरणाच्या दिशेने सुरू आहे. गंगापूर धरणाच्या पाणलोटात पावसाचा जोर ओसरला आहे. २४ तासात गंगापूर धरणात ३०० दलघफू नवीन पाण्याची आवक झाली. पाऊस कमी झाल्याने गंगापूर धरणातून सोडण्यात येत असलेला विसर्ग ६३३६ क्युसेकवरून ३९६९ क्यूसेकवर आणण्यात आला आहे. या धरणातून १ जूनपासून ४.५ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. ५.६ टीएमसी क्षमतेच्या या धरणात ५७.५८ टक्के पाणी साठा आहे. गंगापूर समूहातील कश्यपी धरणातून १००० क्यूसेकने विसर्ग सुरू आहे. पालखेड धरणातूनही १३५६ क्युसेक, पुणेगावमधून ४५० क्यूसेक, भोजापूरमधून ८१० क्यूसेकने विसर्ग सुरू आहे. करंजवन ९४५ क्यूसेक असे नाशिक जिल्ह्यातील १४ धरणांमधून विसर्ग सुरू आहे. नाशिक जिल्ह्यातील ६ धरणं १०० टक्के भरली आहेत. यात भाम, भावली, वालदेवी, आळंदी, भोजापूर, हारणभारी, केळझर या धरणांचा समावेश आहे. वरील धरणातून विसर्ग सुरू असल्याने नांदुर मधमेश्वर बंधाऱ्यातून जायकवाडीच्या दिशेने गोदावरीत काल सकाळी ९ वाजेपर्यंत ४३८८२ क्यूसेकने विसर्ग करण्यात येत होता. तो दुपारी १२ वाजता ३९००० क्यूसेकवर आणण्यात आला. पुन्हा काल सायंकाळी ६ वाजता ३५९१८ क्यूसेकवर आणण्यात आला. काल सकाळी सहा वाजेपर्यंत एकूण २४.५ टीएमसी पाण्याचा विसर्ग गोदावरीत जायकवाडीच्या दिशेने करण्यात आला. कालही गोदावरी दुथडी भरून वाहत होती. दरम्यान, जायकवाडी धरणात नाशिक आणि नगर जिल्ह्यातून पाण्याची आवक होत आहे. काल सायंकाळी ६ वाजता जायकवाडी जलाशयात ५३३३४ क्यूसेक वेगाने पाण्याची आवक सुरू होती. ६ वाजता या जलाशयात ६०.७१ टक्के उपयुक्त पाणी साठा झाला होता. ४६.५५ टीएमसी उपयुक्त पाणी साठा झाला होता, तर मृतसह एकूण साठा ७२.६२ टीएमसी इतका झाला आहे. जायकवाडी जलाशयात २४ तासात ४.८ टीएमसी पाणी दाखल झाले. काल सायंकाळी सहा वाजता भंडारदरा आणि निळवंडे धरणातील पाणी प्रवरा नदीच्या नेवासा तालुक्यातील मधमेश्वर बंधाऱ्याच्या जवळ १२६२० क्यूसेकने विसर्ग नोंदला गेला. त्याच वेळी गोदावरीवरील वैजापूर तालुक्यातील नागमठाण सरिता मापन केंद्राजवळ ४३५०० क्यूसेकने विसर्ग नोंदला गेला. उद्या दिवसभरात जायकवाडी जलाशयात ६५ टक्क्यांहून अधिक पाणी साठा होऊ शकतो. ६५ टक्क्यांचा पुढे हा साठा सरकल्यानंतर अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांची समन्यायी पाणी वाटपातून यंदाही सुटका होणार आहे.

# आमदार पुत्राच्या आलिशान कारच्या धडकेत एक ठार

## सुरेश धस यांचा मुलगा सागरविरोधात सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



**पारनेर (तालुका प्रतिनिधी)–** आष्टी मतदारसंघाचे भाजप आमदार सुरेश धस यांच्या मुलगा सागर धस याच्या कारने दुचाकीला जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात पारनेर तालुक्यातील पळवे खुर्द येथील नितीन प्रकाश शेळके (वय ३४) यांच्या जागीच मृत्यू झाला. हा अपघात सोमवारी (दि. ७) रात्री साडेदहा वाजेदरम्यान अहिल्यानगर पुणे रस्त्यावर पारनेरच्या जातेगाव घाट फाट्यावर झाला. या प्रकरण मंगळवारी दुपारी सुपा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

स्वप्निल पोपट शेळके यांनी सुपा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन सागर सुरेश धस (रा. आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवारी रात्री साडेदहा वाजेदरम्यान नितीन शेळके अहिल्यनगर-पुणे महामार्गावर पळवे खुर्द शिवारातील जातेगाव फाट्यावर त्याच्या दुचाकीवरून (क्रमांक एमएच १६, डिजे ३७६५) रस्ता ओलांडत असताना सागर धस याच्या आलिशान कारने (एम.जे. ग्लोस्टर एमएच २३, बीजी २९२९) पाठीमागून जोराची धडक दिली.

सागर अहिल्यानगरकडून पुण्याच्या दिशेने निघाला होता. जोराची धडक बसल्याने नितीन शेळके यांना दवाखान्यात नेईपर्यंत त्यांचा मृत्यू झाला. या अपघातात दुचाकीसह आलिशान कारचे मोठे नुकसान झाले आहे. पुढील तपास सुपा पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय मंगेश नागरगोजे पुढील तपास करत आहेत.

पान १ वरुन

## आज भारत बंदची हाक

आज होणाऱ्या बंदमध्ये देशभरातील २५ कोटी कामगारांचा सहभाग असेल. बँकिंग, खाणकाम, पोस्टल सर्व्हिस, बांधकाम यांच्यासह विविध क्षेत्रातील कामगार बंदमध्ये सहभागी होणार आहेत. २५ कोटी कामगार बंदमध्ये सहभागी होणार असल्यानं देशातील महत्त्वाच्या सेवांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. १० प्रमुख देशव्यापी कामगार संघटनांनी भारत बंदची हाक दिलेली आहे. त्यासोबत या संघटनांच्या संबंधित अन्य कामगार संघटनादेखील बंदमध्ये सहभाग नोंदवणार आहेत. केंद्र सरकार कामगार, शेतकरी विरोधी धोरणं राबवत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. सरकारी धोरणांचा लाभ केवळ उद्योगपती आणि त्यांच्या व्यवसायांनाच होत असल्याचा संघटनांचा दावा आहे.

**संपामागची प्रमुख कारणं**

**श्रम कायद्यातील बदलांना विरोध**

कामगार संघटनांचं म्हणणं आहे की सरकारने आणलेले ४ नवीन श्रम कोड हे कामगारांचे हक्क कमी करणारे आहेत. यामध्ये युनियनच्या हालचालींवर निर्बंध, कामाचे तास वाढवणे आणि नोकऱ्यांची असुरक्षा यांचा समावेश आहे.

**खासगीकरण आणि ठेका पद्धतीचा निषेध**

सरकारी मालमत्तेच्या खासगीकरणाच्या निर्णयाविरोधात तसेच कंत्राटी पद्धतीने भरती वाढवल्याच्या धोरणांना विरोध केला जात आहे.

**शेतकऱ्यांचे प्रश्न**

संयुक्त किसान मोर्चाही या संपात सहभागी असून, किमान आधारभूत किंमतीच्या (MSP) कायदेशीर हमीची मागणी तसेच जुन्या कृषी कायद्यांविरोधात सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहे.

**महागाई व बेरोजगारी**

कामगार संघटनांचा आरोप आहे की सरकारने ना तर किमान वेतन वाढवले, ना जुनी पेन्शन योजना पुन्हा सुरू केली, तसेच रोजगार निर्मितीच्या मागण्यांकडेही दुर्लक्ष केले आहे.

या संघटनांचा बंदला पाठिंबा

- संयुक्त किसान मोर्चा
- ग्रामीण कर्मचारी संघ
- रेल्वे, एनएमडीसी लिमिटेड आणि स्टील उद्योगातील सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी आज कोणत्या सेवा बंद?

१. बँकिंग सेवा
२. विमा कंपन्यांच्या सेवा
३. पोस्ट ऑफिस
४. कोळसा खाणींचं काम
५. राज्य वाहतूक सेवा (सरकारी बस)
६. महामार्ग आणि रस्ते बांधकाम
७. सरकारी कारखाने आणि कंपन्यांचं उत्पादन

काय सुरु राहणार?

१. खासगी क्षेत्रातील बहुतेक कंपन्या२. रुग्णालयं, वैद्यकीय आपत्कालीन सेवा
३. खासगी शाळा,महाविद्यालयं, ऑनलाईन सेवा

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मिळणार पेन्शन

केले. अंगणवाडी ही ग्रामीण तसेच शहरी भागातील गरजू महिलांचा आणि लहान बालकांचा महत्वाचा आधार असून, या केंद्रांमध्ये कार्यरत असलेल्या सेविकांना मिळणारे मानधन खूपच कमी असून ते किमान वेतनापेक्षा कमी असल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मे २०२५ मध्ये हे लक्षात आले की सुमारे दोन लाख अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मार्च २०२५ या महिन्याचे मानधन अद्याप त्यांच्या बँक खात्यात जमा झालेले नाही.

राज्यातील अंगणवाडी सेविकांनी त्यांच्या विविध मागण्यांच्या समर्थनार्थ एप्रिल २०२५ मध्ये किंवा त्याच कालावधीत मुंबईतील आझाद मैदानात मोर्चाचे आयोजन केले होते. या वेळी अंगणवाडी कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन व ग्रॅज्युइटीसंदर्भातील प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवण्यात आला असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी अंगणवाडी कर्मचारी कृती समितीला दिली होती. या पार्श्वभूमीवर, अंगणवाडी सेविकांना थकीत मानधन त्वरीत देणे, पेन्शन व ग्रॅज्युइटीच्या प्रस्तावांना मान्यता देणे तसेच त्यांचे विविध प्रश्न सोडवून त्यांना किमान वेतनाचा लाभ मिळावा, यासाठी शासनाने कोणती पावले उचलली किंवा कोणती कार्यवाही सुरू केली आहे, याचा खुलासा करण्यात यावा, अशी मागणी आमदार शशिकांत शिंदे आणि इतर प्रश्नकर्त्यांनी विधान परिषदेत केली.

यास उत्तर देताना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले की, एकात्मिक बालविकास सेवा ही केंद्र सरकारच्या मदतीने राबवली जाणारी योजना असून, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे मानधन देण्यासाठी केंद्र शासनाचा हिस्सा, राज्य सरकारचा हिस्सा आणि अतिरिक्त राज्य निधी या तीन स्रोतांमधून आर्थिक तरतूद केली जाते. नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस निधी उपलब्ध होण्यासाठी थोडा वेळ लागतो, आणि निधी मिळताच मानधन वितरणाची प्रक्रिया सुरू केली जाते.

त्यानुसार, मार्च २०२५ चे मानधन २५ एप्रिल २०२५ रोजी तर एप्रिल महिन्याचे मानधन ६ मे २०२५ रोजी वितरित करण्यात आले आहे. सध्या मागील सर्व महिन्यांचे मानधन देण्यात आले असून कोणतीही थकबाकी शिल्लक नाही. अंगणवाडी कर्मचाऱ्यांची नियुक्ती मानधनावर आधारित असून त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करून नियमितपणे मानधन दिले जात आहे. याशिवाय, अंगणवाडी सेविकांना पेन्शन आणि ग्रॅज्युइटीचा लाभ देण्याच्या प्रक्रियेवर काम सुरू असल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

## कंत्राटी कामगारांची लूट...

दोन महिन्यात अहवाल सादर करण्यास सांगण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.

भाजपच्या आमदार देवयानी फरांदे यांनी आवाज विधानसभेत नाशिक महानगरपालिकेने कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या कामगारांच्या पगारातील पैसे ठेकेदार काढून घेत असल्याबाबतची लक्षवेधी सूचना मांडली होती. कंत्राटी कामगारांचा पगार त्यांच्या खात्यात जमा झाल्यावर त्यातली मोठी रक्कम ठेकेदार आणि अधिकारी स्वतःसाठी घेतात. अनेक ठिकाणी कामगारांचे एटीएम कार्ड या लोकांनी स्वतःकडे ठेवले आहेत. ही आधुनिक खंडणीखोरी असून त्याला लगाम लावण्याची मागणी फरांदे यांनी केली.

यावर फडणवीस यांनी नाशिक महापालिकेतील कंत्राटी कामगारांच्या मानधनाचे पैसे अनधिकृतपणे काढण्यात आल्याच्या तक्रारींची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याची घोषणा केली. तसेच,भविष्यात असे प्रकार होऊ नयेत, कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाचा पूर्ण मोबदला मिळाला यादृष्टीने योजना तयार करण्यासाठी कामगार विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येईल. या समिताला दोन महिन्यांत या अनुषंगात यासंदर्भात योजना तयार करण्याचे निर्देश देण्यात येणार असल्याचेही फडणवीसांनी स्पष्ट केले.

दरम्यान, राज्य सरकारने कंत्राटी कामगारांना त्यांच्या कामाचा पूर्ण मोबदला मिळावा म्हणून त्यांचे पगाराचे पैसे थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय केला. आता जर एटीएम किंवा अन्य पद्धतीने पैसे लाटले जात असतील तर त्यावर उपाययोजना कराव्या लागतील. अशा पद्धतीने कोणी कामगारांचे पैसे लाटत असेल तर तो फौजदारी गुन्हा आहे. त्यानुसार संबंधितांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून कारवाई करण्याचा इशाराही फडणवीस यांनी दिला.

## निळवंडेसाठी केंद्राकडून...

मान्यतेमुळे निळवंडे प्रकल्पास केंद्र सरकार कडूनही निधी उपलब्धतेचा मार्ग मोकळा आहे. सुमारे ५ हजार २३ रूपयांच्या निधीस मान्यता मिळाल्याने कालव्याच्या उर्वरित कामांना निधी उपलब्ध होणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

सन १९७० मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, प्रकल्पाचा अपेक्षित लाभ शेतकऱ्यांना मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पामध्ये निळवंडे धरण, ७० किलोमीटर लांबीचा उजवा कालवा आणि ८५ किलोमीटर लांबीचा डावा कालवा असून वर्षाला १०.५ टीएमसी पाण्याचा वापर होणार आहे. विशेषत: लाभक्षेत्रातील शेवटच्या गावाला पाणी देण्याच्या दृष्टीने विभागाने सर्व नियोजन केले असून, यापुर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या माध्यमातून महायुती सरकारने निळवंडेच्या कामास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने केलेल्या सहकार्यामुळे लाभक्षेत्रातील शेवटच्या शेतकर्यांना पाणी मिळाले असल्याचे विखे पाटील यांनी आवर्जून सांगितले.

## फेब्रुवारी २०२६ मध्ये जिल्हा...

नगर जिल्हा बँक ही राज्यातील बड्या सहकारी संस्थांपैकी महत्वाची सुबक आर्थिक घडी बसलेली संस्था आहे. या ठिकाणी आतापर्यंत सहकारातील नेत्यांनी राजकीय जोडे बाजूला ठेवून राजकारण केल्याचा इतिहास आहे. मात्र, आता देशपातळीवर सहकार खात्याची निर्मिती झाली असून बँकेवर भाजपचे बडे नेते राधाकृष्ण विखे पाटील यांचे वर्चस्व असल्याचे दिसत आहे. यामुळे एका प्रकारे जिल्हा बँकेत भाजपचा शिरकाव झाल्याचे दिसत असून येणाऱ्या निवडणुकीत भाजपचे नेते हे वर्चस्व कायम ठवणार का? असा प्रश्न आतापासून उपस्थित करण्यात येत आहे.

दरम्यान, जिल्हा बँकेवर सर्वपक्षीय राजकीय नेत्यांचे वर्चस्व असल्याचे दिसत असले तरी प्रत्येक तालुक्यात स्थानिक नेत्यांचे प्रभाव असल्याचे दिसून आलेले आहे. ही परंपरा पुढील निवडणुकीत कायम राहणार असली तरी अनेक तालुक्यातून बड्या राजकीय कुटूंबातील नवीन नेतृत्वाची एंट्री जिल्हा बँकेच्या निमित्ताने सहकाराच्या राजकारण होणार असल्याचे दिसत आहे. यामुळे श्रीरामपूर, राहाता, पारनेर, कर्जत-जामखेड, नगर, संगमनेर, अकोले या तालुक्यातून नवीन चेहरे जिल्हा बँकेला संचालक म्हणून मिळणार असल्याचे सांगण्यात आले. यामुळे सहा महिन्यांनी होणाऱ्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीला वेगळे महत्व राहणार आहे.

**आधी स्थानिक स्वराज संस्था त्यानंतर बँक**

जिल्ह्यात दिवाळीच्या दरम्यान जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूका होणार आहेत. त्यानंतर दोन ते तीन महिन्यांनी जिल्हा बँकेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी बँकेच्या सभासद शेतकऱ्यांसह विविध कार्यकारी सोसायटीचे संचालकांना मतदानाचा मान असला तरी प्रत्येक तालुक्यातील सहकाराच्या कार्यक्षेत्रातील राजकारण बँकेच्या निवडणुकीसाठी ढवळून निघत असल्याने बँकेच्या निवडणुकीत मोठे अर्थ 'कारण' दडलेले आहे.

**अशी आहे बँकेची आर्थिक स्थिती**

जिल्हा बँकेचे भाग भांडवल हे ३८ हजार कोटी रुपयांचे असून १० हजारांहून अधिकच्या ठेवी आहेत. बँकेच्यावतीने कर्जापोटी ७ हजार कोटीचे वाटप करण्यात आलेले असून यात पिक कर्जाचा वाटा हा ३ हजार ५०० ते ४ हजार कोटींचा आहे. यंदा कर्जमाफीच्या आशेमुळे बँकेच्या वसूलीवर परिणाम झाल्याचे दिसत असून एकूण शेती कर्जाच्या ५२ टक्के वसूली झाल्याचे दिसत आहे.